## रे.क.नं. ५४/२०१७ नि. २२,२३ एकत्रीत खालील आदेश.
(CNR No.MHKO11004162017)

वादीने सदरचा अर्ज अबेटमेंट सेट असाईड होवून प्रतिवादी क्रमांक २४ चे वारस रेकॉर्ड घेणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी याच अर्जावर म्हणणे दाखल करुन वादीने दिलेले कारण रास्त व संयुक्तीक नाही. मयताचे वारस रेकॉर्डवर घेणेचे कामी वादींनी तत्परतेने प्रयत्न केलेचे नमुद केलेले नाही. त्यामुळे वादीचे अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादी, प्रतिवादी यांचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाचे कामी वादी यांनी प्रतिवादी क्रमांक २४ यांचे वारस अभिलेखावर वेळेत न घेतल्यामुळे त्यांचेविरुध्द अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. याकामी निशाणी २१ खाली आदेश पारीत करुन झालेला विलंब माफ केलेला आहे. वादीचा दावा हा हक्कज्ञापनाचा व आज्ञार्थी मनाईचा असल्याने प्रतिवादी क्र. २४ चे वारस दाव्याच्या याक्षणी प्रथमदर्शी आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. २४ च्या वारसांना अभिलेखावर घेतल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा निर्णय गुणदोषावर करणेस मदतच होणार आहे.

४. प्रस्तुत दाव्याचे कामी यातील प्रतिवादी क्र. २४ हे तारीख १४.०२.२०१३ रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ क्रम ३ प्रमाणे दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी सदर दोन्ही अर्जास त्याच अर्जावर म्हणणे देवून तीव्र हरकत नोंदविली आहे. प्रतिवादी यांनी अर्जात वादी यांनी प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास केवळ मोघमपणे ' जवळचे व कायदेशिर वारस असे नमुद केले आहे. त्यामुळे प्रतिवादी नं. २४ हे मयत असल्याचे त्यांना समजून आले नाही. प्रतिवादी मयत झाल्यानंतर त्याचे वारस

रेकॉर्डवर येणे अतिशय महत्वाचे असते. प्रतिवादी नं.२४ हा इतर प्रतिवादींच्या बरोबर दाव्यात आवश्यक पक्षकार होता. यामुळे सदर मयत प्रतिवादीनं. २४ चे वारस देखील दाव्याचे कामी या स्थितीत आवश्यक असलेचे दिसून येते. खेडेगावामध्ये ब-याच वेळा मयत व्यक्तीच्या मृत्युची नोंद अभिलेखावर केली जात नाही. त्यामुळे मृत्यु दाखला मिळणेस विलंब होतो. त्यामुळे तांत्रीक दृष्टया जरी प्रतिवादी यांनी तीव्र विरोध केला असल्याचे दिसून येते. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ क्रम ३ प्रमाणेच्या प्रती आवश्यक असलेली तरतुद या अर्जाचे कामी पुरक असलेचे दिसून येते. हक्कज्ञापनाच्या व अज्ञार्थी मनाई सारख्या दाव्यामध्ये मयत प्रतिवादी नं.२४ चे वारस अभिलेखावर येणे दाव्याचा अंतिम गुणदोषावरती निर्णय होणेस मदत करणारे आहे. या क्षणी प्रतिवादी नं.२४ चे वारस दाव्यामध्ये अभिलेखावर आल्यास प्रतिवादी यांचे नुकसान होणार नसल्याचे दिसून येते. त्यामुळे वादी यांचा प्रतिवादी नं.२४ चे वारस रेकॉर्डवर घेणेचा अर्ज तसेच अबेटमेंट सेट-असाईडचा अर्ज मंजूर करणेच्या निर्णयाप्रत मी येवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्जदारचा नि.२२ व २३ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादी यांनी प्रतिवादी क्र. २४ चे वारस अभिलेखावर घ्यावेत.

सही/-
(सं.मा.जाधव)
दुसरे दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पेठ वडगांव.

दिनांक ०६.१२.२०१८.

**CERTIFICATE.**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same,word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Mrs. Rajashri Rajendra Sawant (L.G.) |
| Name of Court | Shri. S.M.Jadhav, 2nd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Peth Vadgaon |
| Date of Dictation | 06.12.2018. |
| Judgment signed by the P.O. on | 06.12.2018. |
| Judgment/Order uploaded on | 07.12.2018. |